फौ. कि. अर्ज क्र.५७/२०२४
अमीना –वि– महादू व इतर
<u>नि.क्र. १ खाली</u>

**माझे नांव :-** **अमीना कमरूद्दीन शेख,** वय ३८ वर्षे,
व्यवसाय – व्यापार, रा.बनशेळकी रोड, बरकत नगर,
उदगीर जि. लातूर.

## फौजदारी प्रक्रिया कलम २०० अन्वये जबाब

दि.०९.०२.२०२४ रोजी दुपारी १.३० वाजता मी उदगीर येथील न्यायालयामध्ये गैरअर्जदार यांचेविरूद्ध सुरू असलेल्या केससंदर्भात आले होते. मी त्या दिवशी अपील दाखल करावयाचे असल्यामुळे न्यायालयातून कागदपत्रे काढून घेवून घरी परत चालले होते. त्यानंतर मी न्यायालयातून बाहेर पडून रेल्वे स्टेशनजवळ असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ पोहोचले. त्यावेळी मला महादू पंढरीनाथ कांबळे, शेखर नरसिंग गायकवाड, कुमार पंढरीनाथ कांबळे हे लोक आले व त्यांनी मला अडविले. तसेच माझा हात पकडला व मला लाथाबुक्क्यांनी मारहाण करू लागले. मी महादू पंढरीनाथ कांबळे, शेखर नरसिंग गायकवाड, कुमार पंढरीनाथ कांबळे यांना एक लाख रूपये दहा वर्षापूर्वी दिले होते. त्यासंदर्भात आमची उदगीर येथील न्यायालयात केस सुरू होती. त्यावेळी देखील त्यांनी मला मारहाण केली होती. सर्व गैरअर्जदार घटनेच्या दिवशी मला म्हणाले की, तु जर अपील दाखल केले अथवा आमचेविरूद्ध उलटी केस केली तर तुला जिवंत सोडणार नाही, आज कमी मारले आहे असे म्हणाले. आमचे भांडण त्यावेळी हसीना हुस्सेन शेख, सना शादुल शेख या लोकांनी सोडविले तसेच आजूबाजूच्या जमा झालेल्या लोकांनी सोडविले. त्यानंतर मी माझ्या

घरी गेले. त्यानंतर मी तेथून ग्रामीण पोलीस स्टेशन उदगीर येथे गैरअर्जदार यांचेविरूद्ध तक्रार अर्ज देण्यासाठी गेले होते. पोलिसांनी अदखालपात्र गुन्हा दाखल केला परंतु पुढे कोणतीही चौकशी केली नाही. त्यानंतर मी पुन्हा दुस–या दिवशी पोलीस स्टेशनला गेले होते. पोलिसांनी आम्हाला न्यायालयामध्ये जाण्यासाठी सांगितले. त्यानंतर प्रस्तूतची फिर्याद दाखल केली आहे. आरोपी यांना शिक्षा व्हावी, यासाठी प्रस्तुतची केस दाखल केली आहे.

आशीनी

साक्षीदाराची सही

दिनांक :– १२/११/२०२४

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

12/11/2024

( के.ए.पोवार )

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

( न्यायालय क्र.२ ) उदगीर